**सं.फौ.ख.क्र.४१६/२०२२**
सरकार — वि.- राजु बहुरूपे
निशाणी - १८

**सरकारतर्फे साक्षदार क्रं.- १**

मी शपथपुर्वक खरे सांगतो की,

नाव - दत्तात्रय शेनफड पडोळ
वय - ५२ वर्ष, व्यवसाय - व्यापार,
राह.- खुपगाव, ता. जि. बुलढाणा.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विदवान सहाय्यक सरकारी अभियोक्ता - श्री.के.व्ही.गारमोडे यांचे मार्फत सुरु -</u>**

मी आरोपीला ओळखत नाही. मी त्यांना आज न्यायालयात प्रथम पाहिले आहे. दि.०३.०३.२०२० रोजी सायंकाळी ७.०० वाजताचे सुमारास माझा पुतण्या अविनाश शालीग्राम पडोळ हा त्याचे दोन मित्र नामे गजानन बदरखे व गणेश जाधव यांचे सोबत एकाच मोटारसायकलने बुलढाणा येथुन मलकापुर येथे येत होते. सदर मोटारसायकलचा क्र.एम.एच.क्र.२८-एल.७६४७ असा होता. दाताळा जवळील गणपती जिनींग फॅक्टर जवळ एक कापसाने भरलेली ट्रॅक्टरची ट्रॉली रस्त्यावर उभी होती. सदर ट्रॉलीवर ओळख म्हणून रंग किंवा निशानी लावलेली नव्हती. समोरून मलकापुर कडुन वाहन आल्यामुळे माझे पुतण्याला रस्त्यावर उभी असलेली ट्रॅक्टरची ट्रॉली दिसली नसल्यामुळे त्याने त्या ट्रॉलीला मोटारसायकलने धडक दिली. त्यामुळे गजानन बदरखे व माझा पुतण्या अविनाश पडोळ हे मयत झाल्याबाबत मला रात्री ९.३० वाजता फोन आला. त्यानंतर मी लगेच घटनास्थळी आलो. त्यापूर्वी गजानन बदरखे व माझा पुतण्या अविनाश पडोळ यांना लोकांनी मलकापुर येथील दवाखान्यात नेले होते. त्यावेळी मी पाहिले असता सदरची ट्रॅक्टरची ट्रॉली लोकांच्या जिवीतास हानी होईल अशा परिस्थितीत रस्त्यावर उभी केली होती. त्यानंतर मी दवाखान्यात त्यांना पाहण्याकरिता आलो असता ते दोघे मयत झाले होते. तसेच गणेश जाधव हा अपघातात जखमी झाला होता. सदर ट्रॅक्टरचा क्रमांक एम.एच.२८-बी-२४१ असा होता. सदर अपघातास कारणीभुत हे ट्रॅक्टर ड्रायव्हर होते. घटनेबाबत मी पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. आता मला तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी

सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र.१९** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते. घटनेबाबत पोलिसांनी माझेकडे चौकशी करून माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री.जी.डी.पाटील यांच्या मार्फत सुरु.</u>**

२. हे म्हणने खरे आहे की मी घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. मला मलकापुर वरून येणारा ट्रकचे लाईट हे मोटारसायकल चालकाच्या डोळयावर आल्याबाबतची माहिती जखमी गणेश जाधव यांनी सांगितली होती. हे म्हणने खरे नाही की, ट्रॅक्टरची ट्रॉली रस्त्यावर उभी होती हे मी खोटे सांगत आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की तेथे कापसाने भरलेली अनेक वाहने रस्त्यावर उभी होती. अंदाजे तेथे ८ ते १० वाहने रस्त्यावर उभी होती. हे म्हणने खरे नाही की, ट्रॉलीला रंग किंवा ओळख लावली नव्हती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की अपघात विम्याची रक्कम मिळण्यासाठी मी पोलिसांना चुकीचा वाहन क्रमांक सांगितला व आरोपीविरूध्द खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणने खरे नाही की, माझ्या पुतण्याच्या मृत्युस आरोपी जबाबदार नाही. हे म्हणने खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेर तपास काही नाही.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/- | स्वा/- |
| **(अतुल उ.मोटे)**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी<br>(न्यायालय क्र-२), मलकापूर<br>**दि.१६/०७/२०२५** | **(अतुल उ.मोटे)**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी<br>(न्यायालय क्र-२), मलकापूर |